Listening Passage

## **<u>तराफ्यातून जलसफर (राफ्टिंग)</u>**

नद्या डोंगराळ भागातून खळखळत, जोरात, पाण्याचा फेस उडवत वाहतात. त्यांच्या त्या पांढराशुभ्र, फेसाळलेल्या प्रवाहावर जलसफर करण्यात मजा येते. या साहसी खेळाला “राफ्टिंग” असे म्हणतात. राफ्टिंगसाठी जे तराफे (राफ्ट) वापरले जातात ते वायनल फॅब्रिकपासून तयार केलेले असतात आणि त्यात हवा भरून ते फुगवावे लागतात. नदीच्या ज्या प्रवाहात राफ्टिंग केले जाते त्याला ‘रॅपिड्स’ असे म्हणतात. राफ्टिंगसाठी नदीचा वेगाने वाहणारा, उसळता प्रवाह असावा लागतो. या प्रवाहाला जितका जास्त वेग, त्यात जितके जास्त खडक आणि तो जितका वळणदार तितकी राफ्टिंगची मजा वाढत जाते. तसेच यावर हे रॅपिड्स किती कठीण आहेत ते ठरते. रॅपिड्सचे पाच लेव्हल्स असतात, पहिला सोपा आणि पाचवा कठीण.

कॅलिफोर्नियामध्ये लॉस एंजेलिसच्या उत्तरेस सिकोया राष्ट्रीय पार्क आहे. या जंगलात कर्न ही नदी आहे. ही नदी बहुतेक वेळा कोरडी असते. एप्रिलमध्ये व्हिटनी पर्वतावरील बर्फ वितळणे सुरू होते. या वितळलेल्या बर्फाचे पाणी कर्न नदीतून वाहत इसाबेला सरोवरापर्यंत येते. इसाबेला धरणापासून खाली २१ मैलांचा पांढराशुभ्र, फेसाळता प्रवाह वाहतो. अगदी नवीन खेळाडूपासून ते उत्तम खेळाडूपर्यंत सर्वांना इथे राफ्टिंगची संधी मिळते.

पण या खेळात धोकेही आहेत. राफ्टिंग पॉइंट्सवर लाइफ जॅकेट्स, हेल्मेट्स ही संरक्षक साधने दिली जातात. राफ्टिंग सुरु करण्याआधी शिक्षकांच्या सूचना नीट ऐकाव्यात आणि त्यांचे पालन करावे. योग्य ती काळजी घेतली तर हा खेळ सुरक्षित आहे.

### प्रश्न:

१. राफ्टिंग म्हणजे काय?

२. राफ्टिंगसाठी प्रवाह कसा असावा लागतो?

३. रॅपिड्स किती कठीण आहे हे कसे ठरवतात?

४. कर्न नदीमध्ये एप्रिल नंतर का राफ्टींग करता येते?

५. या साहसी खेळातील धोके कसे टाळता येतील?

Listening Passage

**<u>बडे मियाँ रेस्टारंट</u>**

मुंबईत ताज हॉटेलच्या मागच्या गल्लीत 'बडे मियाँ' हे रेस्टारंट आहे. १९४६ मध्ये मोहम्मद यासीन यांनी इथेच रस्त्याच्या कडेला शीश कबाब विकायला सुरूवात केली. त्यावेळी त्यांच्याकडे केवळ १ शेगडी होती. त्यावरच शीश कबाब भाजले जायचे. मोकळया हवेत भाजलेल्या कबाबांच्या वासाने जाणारे येणारे आणि जवळपास राहणारे आकर्षित होत असत. हळूहळू व्यवसाय वाढत गेला आणि बडे मियाँ मुंबईतील एक प्रसिद्ध रेस्टारंट बनले. मोहम्मद यासीन यांना लोक प्रेमाने बडे मियाँ असे म्हणत असत म्हणून या रेस्टारंटला बडे मियाँ हे नाव पडले.

पूर्वी इथे मटणाचे पदार्थ जास्त खाल्ले जात. मात्र आता चिकन आणि व्हेज पदार्थही लोकांना आवडू लागले आहेत. चिकन शीश कबाब, चिकन रोल, चिकन टिक्का, चिकन खिमा यांसारख्या पदार्थांची मागणी आज सर्वांत जास्त आहे. इथे शाकाहारींसाठी वेगळा भाग ठेवला आहे. आता तिथेही बरीच गर्दी असते. इथले पनीर टिक्का, पनीर शीश कबाबही खूप लोकप्रिय आहेत.

सध्या बडे मियाँची तिसरी पिढी हा व्यवसाय सांभाळते. हे पदार्थ ताजे व खास तयार केलेला मसाला वापरून केले जातात. रेस्टारंट संध्याकाळपासून ते मध्यरात्रीपर्यंत सुरु राहते. इथे विशेष म्हणजे लोक बाहेर रस्त्यावर उभे राहून आणि कारच्या टपावर प्लेट ठेवून खातात. सुट्टीच्या दिवशी तर सुमारे १ लाख लोक येतात. समाजातील प्रसिद्ध व्यक्तींबरोबरच सौदी अरेबिया, युरोप, अमेरिकेतील विदेशी पाहुण्यांना ही बडे मियाँतले पदार्थ खूप आवडतात. ताजमध्ये पार्टीसाठी तसेच आसपासच्या क्लबमध्ये येणारे तरुण रात्री- अपरात्री बडे मियाँमध्ये गरमा-गरम कबाब, टिक्के खायला येतात, इतके त्यांना बडे मियाँचं आकर्षण आहे.

## प्रश्न:

१. बडे मियाँ रेस्टारंट कधी आणि कुठे सुरु झाले?

२. रेस्टारंटला बडे मियाँ नाव का पडले?

३. लोकांना बडे मियाँ रेस्टारंट मध्ये कोण-कोणते पदार्थ खायला आवडतात?

४ या रेस्टारंटमध्ये इतरांपेक्षा काय विशेष आहे?

५. या रेस्टारंटमध्ये कोण-कोण आणि केव्हा येतात?

Reading Passage

**<u>ऐतिहासिक चित्रपट</u>**

**मिहीर:** उद्या आपल्या शाळेने विद्यार्थ्यांसाठी चित्रपटाचा  शो ठेवला आहे.

**सानवी:** हो, पण त्या आधी आई-बाबांकडून फॉर्मवर सही घ्यायची आहे.

**मिहीर:** कशाबद्दल आहे हा फॉर्म?

**सानवी:** चित्रपट बघायला आम्ही परवानगी देत आहोत असा फॉर्म आहे.

**मिहीर:** आपण कसे जाणार आहोत सिनेमा हॉलपर्यंत? शाळेतून एकत्र जाण्याची सोय केलेली नाही.

**सानवी:** माझी आई येणार आहे, मला पोचवायला.

**मिहीर:** आम्ही पण कदाचित दोन- तीन जण एका कारने येऊ.

**सानवी:** मला खूप गंमत वाटते आहे.

**मिहीर:** का?

**सानवी:** अरे, खूप दिवसांनी काहीतरी वेगळे होत आहे ना शाळेत, नाही तर रोज तेच तेच.

**मिहीर:** हो, बरोबर आहे. चित्रपट कशाबद्दल आहे माहित आहे का?

**सानवी:** गेल्या वर्षी आपण ज्या ऐतिहासिक गोष्टीच्या पुस्तकावर प्रोजेक्ट केले होते ना, त्यावर हा चित्रपट आहे.

**मिहीर:** हो का? मला इतिहास हा विषय मुळीच आवडत नाही.

**सानवी:** मला ही नाही. पण चित्रपटातील भव्य सेट, उंची पोशाख आणि दागिने बघायला मला आवडतात.

**मिहीर:** मला लढाईचे प्रसंग आणि हत्ती-घोडे बघायला आवडतात.

**सानवी:** तरीही पुस्तकावर आधारित चित्रपटाविषयी सर्वांचे असे मत असते की पुस्तकच अधिक चांगले होते.

**मिहीर:** मला मात्र पुस्तक वाचण्यापेक्षा चित्रपट बघायला आवडतो.

**सानवी:** पुस्तकातील वर्णन वाचून आपण त्या घटनांविषयी स्वतः कल्पना करू शकतो, मात्र चित्रपट बघताना तसे होत नाही, तिथे आपण जे दाखवले आहे तेच बघतो. म्हणून लोकांना पुस्तके अधिक आवडतात.

**मिहीर:** बरोबर आहे तुझे. ऐतिहासिक वगैरे चित्रपट हे मोठ्या पडद्यावर बघायला छान वाटतात. बघूया, हा चित्रपट कसा आहे ते?

**सानवी:** तू जरा लवकर येशील का? आपण पॉपकॉर्न घेऊनच आत जाऊ.

**मिहीर:** चालेल, चल मग उद्या भेटू.

## प्रश्न:

१. आई-बाबांकडून काय आणि कशासाठी हवे आहे?

२. सानवी आणि मिहीर सिनेमा हॉलपर्यंत कसे जाणार आहेत?

३. चित्रपट कशावर आधारित आहे?

४. मिहीर आणि सानवीला अशा चित्रपटात काय बघायला आवडते?

५. तुम्हाला पुस्तक वाचायला आवडते की चित्रपट बघायला आवडतो? आणि का? ते सांगा.

Reading Passage

## हेनरी फोर्ड

सर्व साधारण सामान्य लोकांना विकत घेता येतील अशा कार तयार करणारा म्हणून हेनरी फोर्ड प्रसिद्ध होता. त्याचा जन्म १८६३ साली मिशिगन राज्यात झाला. त्याला चार भावंडे होती. लहान असताना तो वडिलांच्या शेतावर काम करायचा. कोणतीही वस्तू बघितली की त्याचे सर्व भाग तो सुटे सुटे करायचा व परत जोडून ठेवायचा. तो लोकांची घड्याळे पण दुरुस्त करायचा.

तो सोळा वर्षाचा असताना डेट्राइट येथे गेला. नंतर त्याने इंजीनीयर म्हणून एडिसन कंपनीत नोकरी केली. थॉमस एडिसनने त्याला खूप प्रोत्साहन दिले व त्याला म्हणाला " तू घोडा नसलेली गाडी बनविण्याचा तुझा प्रयत्न सोडू नको " फोर्डने इंजिन वापरून गॅसोलीन वर चालणारी अशी चार चाकी सायकल तयार केली. नंतर त्याने स्वत:ची "फोर्ड मोटार कंपनी" सुरु केली. १९०८ साली त्याने "मॉडेल टी" कार तयार केली. ती कार सामान्य लोक सहज विकत घेऊ शकत होते. ती कार चालवायला आणि दुरुस्त करायला पण सोपी होती. आजही फोर्ड कंपनीच्या प्रसिद्ध कार आणि ट्रक लोक आनंदाने विकत घेतात व चालवितात.

## प्रश्न:

१. हेनरी फोर्डचा स्वभाव कसा होता?

२. त्याचे काय स्वप्न होते?

३. थॉमस एडिसन फोर्डला काय म्हणाला?

४. फोर्डच्या पहिल्या कार बद्दल माहिती सांगा.

५. सध्या प्रदूषण विरहित अशी नवीन कोणती वाहने वापरली जातात?